महाराष्ट्र शासन
गृहविभाग
पोलीस उप-अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे
सीआयडी ऑफीस कंपाऊंड, शिवाजीनगर, संगम ब्रीज जवळ, पुणे - ४११००५
दुरध्वनी क्रमांक ०२० - २५५४१७५० ई मेल dysphq.prly@gmail.com

---

## लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना सुचना

पुणे लोहमार्ग पोलीस भरती-२०२१ शारीरिक चाचणीमधील १५२३ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाले आहेत. या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक ०२/०४/२०२३ रोजी **M.C.E. (Maharashtra Cosmopolitan Education Society)**, २३९०, बी.के.बी. हिदायतुल्ला रोड, आझम कॅम्पस, पुणे ४११००१ या ठिकाणी घेण्यात येणार आहे.

तरी लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांनी दिनांक ०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०६.३० वा. पर्यंत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशीरा येणाऱ्या उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

सदर लेखी परीक्षेसाठी येताना उमेदवार यांनी महाआयटी यांनी ई-मेलव्दारे पुरविलेले शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेचे ओळखपत्र डाऊनलोड करून त्याची कलर प्रिंट आणि आवेदन अर्जावरील दोन कलर पासपोर्ट साईज फोटो तसेच या कार्यालयाकडुन मैदानी चाचणी करीता पुरविण्यात आलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे. परीक्षा केंद्रावर उमेदवारांना मोबाईल फोन, डिजिटल घडयाळ, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा इतर तत्सम वस्तू बाळगण्यास परवानगी नाही. अशा वस्तू आपल्या बॅगेत परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवाव्यात अथवा केंद्र परिसरात बॅग संकलन केंद्रात जमा करावे.

तसेच परीक्षा केंद्रावर उमेदवारांना प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, काळा पेन, तसेच पॅड बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी पुरविण्यात येणार आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( चंद्रकांत दत्तात्रय भोसले) ३१/३
पोलीस उपअधीक्षक (मुख्या.)
लोहमार्ग पुणे